**A**

**2012** CODE : **KOI**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

**प्रश्नपुस्तिका क्र. 2**
**मंत्रालय येथे**
**चालणाऱ्या कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान व पद्धती**

एकूण प्रश्न : 150

वेळ : $2\frac{1}{2}$ (अडीच) तास

एकूण गुण : 300

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे ↑    ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

**(ब) मंत्रालयातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग-''अ'' आणि विभाग - ''ब'' सोडविणे आवश्यक आहे.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील''.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा

## विभाग - अ

1. राज्य सर्व बालकांसाठी त्याच्या वयाची __________ वर्षे पूर्ण होईपर्यंत प्रारंभिक बाल्यावस्थेतील देखभाल आणि शिक्षण याची तरतूद करण्याकरीता प्रयत्न करील.
   (1) चार (2) पाच (3) सहा (4) सात

---

2. नियुक्तीनंतर 6 महिन्यापेक्षा अधिक कालावधीकरिता नियुक्ती चालू राहण्याची अपेक्षा असल्यास सेवेत रुजू झाल्यापासून किती कालावधीत वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याबाबत सांगितले पाहिजे ?
   (1) 1 महिना (2) 2 महिने (3) 3 महिने (4) 6 महिने

---

3. खालील विधानांबाबत योग्य पर्याय निवडा
   (a) राज्य पर्यावरण संरक्षणाबाबत कायदा करेल.
   (b) राज्य पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करेल.
   (c) राज्य वने व वन्य जीवसृष्टीचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न करेल.
   (1) (a), (b) बरोबर (2) (b), (c) बरोबर (3) (a), (c) बरोबर (4) वरील सर्व बरोबर

---

4. शासनाला शासकीय कर्मचाऱ्याच्या दिवसाचा किती कालावधी सेवेसाठी उपलब्ध करून घेता येतो ?
   (1) सकाळी 11 ते सायं 5.00 (2) सकाळी 9.45 ते सायं 5.30
   (3) कार्यालयीन संपूर्ण वेळ (4) शासकीय कर्मचाऱ्याचा संपूर्ण कालावधी

---

5. भारतीय घटनेनुसार 'कायदा' यामध्ये पुढीलपैकी कोणत्या बाबींचा समावेश आहे ?
   (1) अध्यादेश, आदेश (2) उपविधी, नियम, विनिमय
   (3) अधिसूचना, रुढी किंवा परिपाठ (4) वरील सर्व

---

6. शासकीय कर्मचाऱ्याची सेवापुस्तके किती प्रतीत ठेवण्यात येतात ?
   (1) एकच-मूळ प्रत (2) दोन प्रती
   (3) तीन प्रती (4) कितीही ठेवता येतात

---

7. शासकीय कर्मचाऱ्यासंबंधात खालील विधाने पहावीत.
   (a) त्याला कार्यालयीन कर्तव्य पार पाडतांना सद्सद्विवेकबुद्धिला न पटणाऱ्या गोष्टी करावयाच्या असल्यास, त्याने शासनाकडे परवानगी मागावी.
   (b) त्याच्या खाती भरपूर रजा शिल्लक असताना त्याने परस्पर रजा उपभोगल्यास त्याने बेशिस्त वर्तन केले असे म्हणता येत नाही.
   म.ना.से (वर्तणूक) नियम, 1979 अन्वये :
   (1) (a) व (b) दोन्ही बरोबर (2) केवळ (a) बरोबर
   (3) केवळ (b) बरोबर (4) दोन्ही अयोग्य

---

**कच्च्या कामासाठी जागा**

8. खालील विधाने वाचा व योग्य पर्याय निवडा.
   (a) विशेष वेतनामुळे वित्तलब्धीमध्ये वाढ होते.
   (b) जबाबदारीमध्ये वाढ झाल्यास विशेष वेतन अनुज्ञेय ठरु शकते.
   (1) (a) व (b) दोन्ही बरोबर (2) (a) बरोबर
   (3) (b) चूक (4) (a) व (b) दोन्ही चूक

9. भारताच्या संविधानामध्ये मुलभूत कर्तव्ये कोणत्या अनुच्छेदाखाली विशद करण्यात आली आहेत ?
   (1) 51 (2) 51 (क) (3) 49 (4) 48

10. राज्याच्या लोकसेवांमध्ये __________ कार्यकारी यंत्रणेपासून अलग ठेवण्याकरता राज्य उपाययोजना करील.
    (1) लोकायुक्त (2) जनपाल (3) माहिती आयुक्त (4) न्याय यंत्रणा

11. विकलांगता माफ करण्याचे अधिकार कोणास आहेत ?
    (1) कार्यालय प्रमुख (2) विभाग प्रमुख
    (3) संचालक, आरोग्य सेवा (4) सचिव, आरोग्य विभाग

12. शासनाची पूर्वमंजूरी घेतली तर शासकीय कर्मचाऱ्यास स्वत:चे नाव खालीलपैकी कोणत्या बाबींशी जोडता येईल ?
    (1) शाळा (2) रुग्णालय (3) ग्रंथालय (4) वरील सर्व

13. खालीलपैकी योग्य विधान निवडा
    (a) एकत्रित निधीमध्ये लोकलेखा समाविष्ट आहे.
    (b) लोकलेखामध्ये एकत्रित निधीचा समावेश आहे.
    (c) एकत्रित निधी व लोकलेखा वेगवेगळे आहेत.
    (d) एकत्रित निधीमध्ये महसूलाचा समावेश असतो.
    (1) (a) व (d) (2) (b) व (d) (3) (c) व (d) (4) केवळ (d)

14. देणगी (गिफ्टस्)संदर्भात खालीलपैकी योग्य विधान कोणते ?
    (1) यात कोणत्याही व्यक्तीने दिलेली विनामूल्य वाहतूक/लिफ्ट् चा समावेश नाही.
    (2) सामाजिक कारणप्रित्यर्थ स्वागत, पाहुणचार म्हणजे देणगी आहे.
    (3) अंत्यसंस्कार/वर्षदिन-करीता कामाशी संबंधित व्यक्तिकडून जास्त किंमतीची देणगी स्वीकारण्यापूर्वी शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक आहे.
    (4) वरील सर्व

**कच्च्या कामासाठी जागा**

15. जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | अनुच्छेद-39 | (i) | ग्रामपंचायतींचे संघटन |
| (b) | अनुच्छेद-44 | (ii) | राज्याने अनुसरावयाची धोरणाची विवक्षीत तत्वे |
| (c) | अनुच्छेद-48 | (iii) | एकरूप नागरी संहिता |
| (d) | अनुच्छेद-40 | (iv) | कृषि व पशुसंवर्धन यांची सुसुत्र व्यवस्था लावणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (1) | (a)-(i) | (b)-(iv) | (c)-(iii) | (d)-(ii) |
| (2) | (a)-(ii) | (b)-(iii) | (c)-(iv) | (d)-(i) |
| (3) | (a)-(iv) | (b)-(iii) | (c)-(ii) | (d)-(i) |
| (4) | (a)-(i) | (b)-(ii) | (c)-(iii) | (d)-(iv) |

---

16. कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला राजकीय पक्षाच्या संघटनेचा सदस्य होता येत नाही मात्र कोणत्या प्रसंगी त्याने या नियमातील तरतूदीचे उल्लंघन केले असल्याचे मानण्यात येणार नाही ?

(1) शासकीय कर्मचाऱ्याने स्वत:च्या वाहनावर निवडणूक चिन्ह लावले.

(2) शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या मालकीच्या निवासस्थानावर निवडणूक चिन्ह लावले.

(3) शासकीय कर्मचाऱ्याने उमेदवाराच्या नावाला अनुमोदन दिले.

(4) शासकीय कर्मचाऱ्याने कोणतीही सूचना न देता आपला मतदानाचा हक्क बजावला.

---

17. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास पुनर्नियुक्ती द्यावयाची झाल्यास खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ? (रुग्णता निवृत्ती वेतनधारक वगळता)

(1) सेवानिवृत्तीच्या तारखेनंतर 6 महिन्याच्या आत पुनर्नियुक्ती केल्यास वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देता येते.

(2) नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या निर्णयाने, 6 महिन्याच्या कालावधीच्या नियुक्ती प्रकरणी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देता येईल.

(3) वरील दोन्ही बरोबर

(4) वरील दोन्ही चूक

---

18. देणगी या संज्ञेत खालीलपैकी कोणती बाब येते ?

(1) प्रासंगिक भोजन
(2) स्वत:च्या वाहनातून नेणे
(3) सामाजिक कारणप्रित्यर्थ केलेला पाहुणचार
(4) निवासव्यवस्था वा आर्थिक लाभ

---

19. वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात __________.

(1) साधारणत: करावी
(2) करू नये
(3) विभागप्रमुखाच्या आदेशाशिवाय करू नये
(4) कार्यालयप्रमुखाने आदेश दिल्यास करावी

---

**कच्च्या कामासाठी जागा**

20. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या संदर्भात शासकीय अधिसूचना दिनांक 11 एप्रिल 2008 अनुसार धार्मिक समारंभाच्यावेळी गट 'क' च्या शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या वैयक्तिक मित्राकडून स्विकारलेल्या किती देणगी मूल्यापेक्षा-अधिक मूल्याबाबत शासनास कळविणे आवश्यक आहे ?

(1) रु. 1,500 पेक्षा अधिक (2) रु. 1,000 पेक्षा अधिक
(3) रु. 500 पेक्षा अधिक (4) रु. 2,000 पेक्षा अधिक

---

21. ''राज्याच्या नियंत्रणाखालील क्षेत्रामध्ये ज्या अनुसुचित जातींना किंवा अनुसुचित जमातींना त्या राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधित्व देण्यात आलेले नसेल त्यांना राज्याच्या नियंत्रणाखालील सेवा संबंधातील आरक्षण करण्यासाठी राज्याला कोणतीही तरतूद करण्यास प्रतिबंध होणार नाही'' ही संविधानातील कितवी सुधारणा आहे ?

(1) 74 वी सुधारणा (2) 75 वी सुधारणा (3) 76 वी सुधारणा (4) 77 वी सुधारणा

---

22. सेवा विषयक किंवा विद्याविषयक मानविशेष नसलेला कोणताही किताब राज्याकडून प्रदान केला जाणार नाही, असे कोणत्या अनुच्छेदामध्ये नमुद केले आहे ?

(1) 51 (क) (2) 18 (1) (3) 19 (3) (4) 16 (4)

---

23. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 51 बाबत पुढील विधानाबाबत योग्य पर्याय निवडा.

(a) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांच्या संवर्धनासाठी राज्य प्रयत्नशील राहील.
(b) अखिल मानव शांततेसाठी धार्मिक प्रोत्साहन देण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

(1) (a) बरोबर (2) (b) बरोबर (3) (a) व (b) बरोबर (4) (a) व (b) चूक

---

24. भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदास अनुसरून म.ना. से वर्तणूक नियम, 1979 तयार करण्यात आलेले आहेत ?

(1) 309 (2) 209 (3) 51 (4) 14

---

25. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 नुसार शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटुंबात खालीलपैकी कोणाचा समावेश (ते संपूर्णपणे त्याच्यावर अवलंबून असतील तर) होतो ?

(a) सज्ञान बहीण (b) सज्ञान भाऊ

(1) (a) व (b) दोन्हीचा (2) (a) व (b) पैकी कोणाचाच नाही
(3) केवळ (a) चा (4) केवळ (b) चा

---

26. घटनेच्या भाग चार क मध्ये कोणता विषय समाविष्ट आहे ?

(1) संघराज्य (2) राज्ये (3) मूलभूत कर्तव्ये (4) नगरपालिका

---

27. शासकीय सेवेसाठी असमर्थ ठरवलेल्या कोणत्याही व्यक्तीला (रुग्णता निवृत्तीवेतनधारकाच्या बाबतीत) ________ शिवाय पुनर्नियुक्त करण्यात येऊ नये.

(1) विभागीय चौकशी अहवाल (2) वैद्यकीय समितीचे प्रमाणपत्र
(3) पोलीस चौकशी अहवाल (4) यापैकी नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**28.** संविधानाच्या अनुच्छेद 49 संदर्भात कोणते विधान सत्य आहे ?

(a) न्याय यंत्रणा कार्यकारी यंत्रणेपासून वेगळी ठेवणे.

(b) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन करणे.

(c) राष्ट्रीय महत्वाची स्मारके व स्थाने आणि वस्तू यांचे संरक्षण करणे

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) कोणतेही नाही

---

**29.** सेवा पुस्तकांची व सेवा पटांची वार्षिक पडताळणी कोणत्या महिन्यात करण्याच्या सूचना आहेत ?

(1) जानेवारी (2) मार्च (3) मे (4) डिसेंबर

---

**30.** खालील विधाने पहावीत.

(a) शासकीय कर्मचारी वस्तुरुपाने परतफेड होऊ शकेल अशा पद्धतीने पैसे उसने देऊ शकतो.

(b) शासकीय कर्मचारी खाजगी मित्राकडून तात्पुरत्या स्वरूपाचे बिनव्याजी कर्ज उभारु शकतो.

म.ना.से.(वर्तणूक) नियम, 1979 अन्वये अचूक विधान कोणते ?

(1) दोन्ही (2) केवळ (a) (3) केवळ (b) (4) दोन्ही अयोग्य

---

**31.** शासकीय औद्योगिकेतर कर्मचारी संघटनेच्या व्यवस्थापन समितीच्या सभेसाठी किती सदस्यांची उपस्थिती गणपूर्तीसाठी आवश्यक आहे ?

(1) $\frac{1}{2}$ (2) $\frac{1}{3}$ (3) $\frac{1}{4}$ (4) $\frac{1}{5}$

---

**32.** शासकीय कर्मचाऱ्यांच्या (औद्योगिकेत्तर) संघटनेच्या सदस्याची वर्गणी थकित किंवा देय असल्यास अशा सदस्यास किती कालावधीसाठी कोणताही लाभ मिळण्याचा हक्क नाही –

(1) अशी थकबाकी चुकती करेपर्यंत

(2) एकूण 2 महिने

(3) सर्व थकबाकी चुकती करेपर्यंतचा काळ आणि त्यानंतरचे 3 महिने

(4) सर्व थकबाकी चुकती करेपर्यंतचा काळ आणि त्यानंतरचे 2 महिने

---

**33.** खालील प्रकरणे पहावीत.

(a) एका सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने पंकज या शासकीय कर्मचाऱ्याच्या नावाने स्पर्धेत बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना करंडक दिला.

(b) शैलजा या शासकीय कर्मचाऱ्याच्या मुलीने एका धर्मदाय संस्थेचे विश्वस्त पद स्वीकारले.

उपरोक्तपैकी कोणी म.ना.से.(वर्तणूक) नियम, 1979 चा भंग केला असे म्हणता येईल ?

(1) पंकज व शैलजा दोघांनी (2) केवळ पंकजने

(3) केवळ शैलजाने (4) कुणीही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**34.** शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकाची मूळ प्रत कोठे उपलब्ध असते ?

(1) स्ट्राँग रूम
(2) अभिलेख कक्ष
(3) कार्यालय प्रमुखाच्या अभिरक्षेत
(4) विभाग प्रमुखाच्या अभिरक्षेत

---

**35.** भारतीय घटनेच्या कलम 14 अन्वये कोणता मूलभूत अधिकार प्रदान करण्यात आला आहे ?

(1) भाषण व अभिव्यक्ती याचे स्वातंत्र्य
(2) भारताच्या राज्यक्षेत्रात मुक्तपणे संचार करणे
(3) धर्माचे आचरण व प्रसार
(4) कायद्यापुढे समानता

---

**36.** रजेवर असलेल्या अधिकाऱ्याच्या बाबतीत त्याच्या पदाचा कार्यभार इतर अधिकाऱ्याला सोपविण्यासाठी तो किमान किती दिवस रजेवर असावा ?

(1) 3 दिवस
(2) 7 दिवस
(3) 16 दिवस
(4) वरील कोणत्याही परिस्थितीत

---

**37.** कायद्याने प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवित किंवा __________ स्वातंत्र्य या पासून वंचित केले जाणार नाही.

(1) धर्म
(2) शिक्षण
(3) व्यापार
(4) व्यक्तिगत

---

**38.** शासकीय सेवेतील कायम नियुक्तीपूर्वी शासकीय कर्मचाऱ्यांना वैद्यकीय तपासणीसाठी कोणासमोर हजर रहावे लागते ?

(1) मुंबई शहरात शासकीय रुग्णालयांचे अधीक्षक
(2) जिल्हा शल्यचिकित्सक
(3) अधीक्षक ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे
(4) वरीलपैकी कोणतेही एक

---

**39.** वेतनामध्ये खालीलपैकी कोणत्या बाबींचा समावेश होत नाही ?

(a) विशेष वेतन
(b) महागाई भत्ता
(c) विशेष महागाई वेतन
(d) निर्वाह भत्ता

(1) (a), (b) व (c)
(2) (b) व (d)
(3) (a) व (b)
(4) (a), (b), (c) व (d)

---

**40.** कार्यालय प्रमुखाच्या सेवापुस्तकातील नोंदी कोणी साक्षांकित केल्या पाहिजेत ?

(1) लेखा परीक्षा अधिकारी
(2) त्याच्या निकटचा वरिष्ठ अधिकारी
(3) रोख लेखापाल
(4) लेखापाल

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**41.** खालील विधाने पहावीत.

(a) स्पर्धा परीक्षाबाबत मार्गदर्शनार्थ वृत्तपत्रात लेख लिहिण्यासाठी अथवा दूरदर्शनवरील कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्याला शासनाच्या पूर्व परवानगीची आवश्यकता नाही.

(b) माहितीच्या अधिकाराबाबत मार्गदर्शनपर पुस्तिका प्रकाशित करण्यापूर्वी शासकीय कर्मचाऱ्याने शासनाची पूर्वमंजूरी घ्यावी.

(1) (a) व (b) दोन्ही बरोबर (2) केवळ (a) बरोबर

(3) केवळ (b) बरोबर (4) दोन्ही अयोग्य

---

**42.** (a) मागासवर्गीय शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या नोकरीशी संबंधित बाबींविषयी सामाजिक न्याय किंवा आदिवासी विकास विभागाच्या प्रभारी मंत्र्यांकडे अभिवेदन करता येते.

(b) कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या नोकरीशी संबंधित बाबीविषयी कोणत्याही आमदाराला पत्र लिहिता येते.

(1) वरील (a) बरोबर (2) वरील (b) बरोबर

(3) वरील दोन्ही बरोबर [(a) व (b)] (4) वरील दोन्ही चूक [(a) व (b)]

---

**43.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या संदर्भातील शासकीय अधिसूचना दिनांक 8 फेब्रुवारी, 2007 अन्वये शासकीय कर्मचारी शासनाच्या पूर्व-मंजूरी शिवाय कोणत्या निधी-उभारणीच्या-प्रयत्नांमध्ये सहभागी होऊ शकेल ?

(1) शिक्षक दिन निधी (2) बाल कल्याण निधी

(3) महिला सशक्तीकरण निधी (4) ध्वजदिन निधी

---

**44.** अनुसुचित जाती, अनुसुचित जनजाती आणि इतर दुर्बल घटक यांच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धनाची तरतूद संविधानातील अनुच्छेद __________अन्वये करण्यात आली आहे.

(1) 44 (2) 45 (3) 46 (4) 47

---

**45.** भारतीय संविधानाच्या अनु-15 मधील तरतुदीमुळे __________ व __________ यांच्याकरता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्यास प्रतिबंध होणार नाही.

(1) महिला व बालकल्याण (2) स्त्रीया व बालके

(3) विस्थापित व अपंग (4) विशेष प्रवर्ग व तळागाळातील नागरिक

---

**46.** शासकीय कर्मचाऱ्याने __________.

(1) हुंडा अप्रत्यक्षपणे घेतल्यास हरकत नाही.

(2) आवश्यक असल्यास हुंडा घेण्यास हरकत नाही.

(3) दुसऱ्याला हुंडा घेण्यास प्रोत्साहन देण्यास हरकत नाही.

(4) हुंडयापासून स्वत:ला पूर्णपणे दूर ठेवले पाहिजे.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

47. रु. 500 ची देणगी स्वीकारण्यासाठी कोणत्या गटातील शासकीय कर्मचाऱ्यास, ती बाब शासनास कळविणे आवश्यक आहे ?
(1) गट–ब (2) गट–क (3) गट–ड (4) कोणत्याच नाही

48. राष्ट्रीय महत्वाची स्मारके व स्थाने आणि वस्तु यांचे संरक्षण करणे ही बाब यामध्ये नमुद आहे.
(1) मूलभूत कर्तव्य (2) मूलभूत हक्क (3) निदेशक तत्वे (4) यापैकी नाही

49. अस्पृश्यता नष्ट करण्याची तरतूद संविधानातील अनुच्छेद ________ अन्वये करण्यात आली आहे.
(1) 16 (2) 17 (3) 18 (4) यापैकी नाही

50. कोणत्याही अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर ________ साक्षीदार होण्याची सक्ती केली जाणार नाही.
(1) राज्याविरुद्ध (2) केंद्र शासनाविरुद्ध
(3) स्वत:विरुद्ध (4) स्वत:च्या व्यक्तिस्वातंत्र्याविरुद्ध

51. स्वीयेत्तर सेवेच्या कालावधीत कर्मचाऱ्याचे सेवापुस्तक कोठे असेल ?
(1) स्वीयेत्तर नियोक्त्याच्या कार्यालय प्रमुखाकडे (2) मंत्रालयीन संबंधित विभागाच्या रोख शाखेत
(3) मूळ कार्यालयात (4) मूळ विभागात

52. व्यंग असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याची अन्य ठिकाणी बदली झाली व त्या ठिकाणचे (बदलीनंतरचे) काम वेगळ्या स्वरूपाचे असल्यास असा कर्मचारी शारीरिकदृष्ट्या ज्या कारणामुळे व्यंग आहे ते कारण नवीन काम करण्यास अडचणीचे आहे किंवा कसे याबाबतचे अभिप्राय कोणी द्यावे ?
(1) सचिवांनी
(2) कर्मचाऱ्याने
(3) सहकाऱ्याने
(4) शासकीय सेवेकरिता वैद्यकीय प्रमाणपत्रावर सही करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याने.

53. भारताचा एकत्रित निधी म्हणजे ________ .
(1) केंद्र सरकारला प्राप्त झालेला महसूली निधी.
(2) राजकोष पत्रांच्या विक्री द्वारे उभारलेली रक्कम.
(3) कर्जे किंवा अर्थोपाय आगाऊ रकमा आणि कर्जाच्या परतफेडीच्या रूपाने शासनाकडे जमा झालेला सर्व पैसा.
(4) वरील सर्व.

54. अनुच्छेद ________ मधील तरतुदीनुसार ________ या भागाने प्रदान केलेले मूलभूत हक्क हिरावून घेणार नाही किंवा त्यांचा संकोच करणारा कोणताही कायदा करणार नाही.
(1) 12, केंद्र (2) 12, राज्य (3) 13, केंद्र (4) 13, राज्य

**कच्च्या कामासाठी जागा**

55. योग्य पर्याय निवडा -

(a) सारख्याच जबाबदारीच्या पदावर बढती झाल्यास ते पद रिक्त झाल्यापासून उच्चतर वेतन अनुज्ञेय नाही.

(b) वाढीव जबाबदारीच्या पदावर बढती झाल्यास पदाची कर्तव्ये स्वीकारण्यापासून उच्चतर वेतन अनुज्ञेय नाही.

(1) (a) बरोबर आहे (2) (b) बरोबर आहे

(3) (a) व (b) दोन्ही चूक (4) (a) व (b) बरोबर आहे

---

56. खालीलपैकी अयोग्य जोडी निवडा.

(1) संक्रमण काळ-रजा (2) संक्रमण काळ-दौरा

(3) पदग्रहण अवधी-बदली (4) पदग्रहण अवधी-पदोन्नती

---

57. कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा किंवा या पैकी कोणत्याही कारणास्तव प्रवेश नाकारला जाणार नाही ''सदर बाब खालील पर्यायाबाबत खरी ठरते.

(1) राज्यांकडून चालविल्या जाणाऱ्या संस्था (2) राज्य निधीतून सहाय्य मिळत असलेल्या संस्था

(3) (1) व (2) (4) यापैकी नाही

---

58. ज्या संघटनेची उद्दिष्टे किंवा कार्य भारताच्या __________ आणि __________ किंवा सुव्यवस्थेला किंवा नैतिक मूल्यांना बाधक असतात अशा संघटनेत शासकीय कर्मचारी सहभागी होणार नाही.

(1) सार्वभौमत्व, एकात्मता (2) संस्कृती, उत्पत्ती

(3) अर्थव्यवस्था, वैचारिकता (4) कार्यपद्धती, उपयुक्तता

---

59. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या दिनांक 31 जुलै, 2008 पर्यन्त सुधारित 2008 मध्ये प्रकाशित केलेल्या आवृत्तीची प्रस्तावना कोणी लिहिली आहे?

(1) मा. मुख्यमंत्री (2) मा. उपमुख्यमंत्री (3) मुख्यसचिव (4) प्रधान सचिव (साप्रवि)

---

60. संविधानातील भाग-4 मध्ये कामाच्या शिक्षणाच्या आणि विवक्षित बाबतीत लोक सहाय्याच्या हक्काची तरतूद अनुच्छेद __________ अन्वये करण्यात आली आहे.

(1) 41 (2) 42 (3) 43 (4) 43 क

---

61. दिनांक 16/8/81 किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्याला सेवापुस्तकात नोंदविलेल्या जन्माबद्दलच्या नोंदी कधीपर्यंत दुरुस्त करता येतात?

(1) दुरुस्त करता येत नाहीत.

(2) नियुक्तीच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या आत.

(3) सबळ पुरावा उपलब्ध करून दिल्यास निवृत्ती पूर्वी कधीही.

(4) सबळ पुरावा उपलब्ध करून दिल्यास निवृत्तीनंतर चार वर्षांच्या आत.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

62. जंगम मालमत्तेत खालील बाबींचा समावेश होतो.
(1) भांडी व काचसामान (2) पुस्तके
(3) कपडे (4) वरीलपैकी कोणत्याच नाही

63. राज्य कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, __________ जन्मस्थान या अथवा या पैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करणार नाही.
(1) गोत्र (2) लिंग (3) व्यवसाय (4) शिक्षण

64. शासकीय कर्मचारी खालीलपैकी कोणत्या वेळी शासनाच्या पुर्वमान्यतेशिवाय साक्ष देऊ शकणार नाही ?
(1) न्यायिक चौकशीच्या वेळी
(2) विभागीय चौकशीच्या वेळी
(3) संसद किंवा विधानमंडळ नियुक्त प्राधिकरणासमोर
(4) प्रसार माध्यमासमोर

65. खालील विधाने वाचा व योग्य पर्याय निवडा.
(a) सेवापुस्तकामध्ये नियुक्तीच्या पदाचे नाव लिहिणे आवश्यक नाही.
(b) सेवापुस्तकामध्ये वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्राची नोंद आवश्यक आहे.
(1) (a) बरोबर आहे (2) (b) बरोबर आहे
(3) (a) व (b) दोन्ही बरोबर (4) (a) व (b) दोन्ही चूक

66. शासकीय कर्मचाऱ्यांच्या (औद्योगिकेतर) संघटनेच्या कोणत्याही सदस्यास संघटनेचे लाभ मिळण्याकरिता तो किमान किती महिने सदस्य असला पाहिजे ?
(1) 1 (2) 3 (3) 6 (4) 12

67. भारतीय घटनेत कोणत्या हक्काचा मूलभूत हक्कांमध्ये समावेश केलेला नाही ?
(1) समानतेचा हक्क (2) शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचा हक्क
(3) मालमत्ता संपादन करण्याचा हक्क (4) शोषणाविरुद्धचा हक्क

68. स्वीयेतर सेवेतील कालावधीतील नोंदी साक्षांकित करण्याचे अधिकार कोणास आहेत ?
(1) नियुक्ती प्राधिकारी (2) लेखापरीक्षा अधिकारी
(3) शासन (4) कार्यालय प्रमुख

**कच्च्या कामासाठी जागा**

**69.** शासकीय कर्मचाऱ्यास शासनाच्या पूर्वमंजूरीखेरीज

(1) दुसरी नोकरी स्वीकारता येत नाही

(2) सेवानिवृत्तीनंतरच्या वाणिज्यिक (कमर्शियल) नोकरीसाठी सेवेत असतांना वाटाघाटी करता येत नाहीत.

(3) वरील (1) व (2) बरोबर

(4) वरील (1) व (2) चूक

---

**70.** खालील विधाने वाचा व योग्य पर्याय निवडा.

(a) वैद्यकीय प्रमाणपत्रावर विभाग प्रमुखाची सही आवश्यक असते.

(b) सर्वांचे वैद्यकीय प्रमाणपत्र त्या कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांना बघता येते.

(1) (a) बरोबर (2) (b) बरोबर (3) (a) व (b) बरोबर (4) (a) व (b) चूक

---

**71.** संविधानातील राज्यधोरणांची निर्देशक तत्वे यामध्ये समान न्याय व कायदे विषयक मोफत सहाय्य संदर्भातील अनुच्छेद 39 क चा समावेश संविधानाच्या कितव्या सुधारणेअन्वये करण्यात आला आहे?

(1) 40 वी सुधारणा (2) 41 वी सुधारणा (3) 42 वी सुधारणा (4) 43 वी सुधारणा

---

**72.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या नियम 27 अन्वये हुंड्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. या नियमाच्या प्रयोजनार्थ-''हुंडा'' या शब्दाला - हुंडा प्रतिबंधक अधिनियम, 1961 च्या कोणत्या नियमाचा अर्थ अभिप्रेत आहे?

(1) 1961 चा 21 (2) 1961 चा 24 (3) 1961 चा 28 (4) 1961 चा 30

---

**73.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम कोणत्या दिनांकापासून अंमलात आले आहेत?

(1) 12 जुलै 1997 (2) 21 जुलै 1979 (3) 12 जुलै 1979 (4) 21 जुलै 1981

---

**74.** भारतीय संविधानाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी भारताच्या राज्यक्षेत्रात अंमलात असलेले सर्व कायदे, ते जेथवर या तरतुदींशी विसंगत असतील तेथवर ते विसंगतीच्या व्याप्तीपुरते शुन्यवत असतील असे अनुच्छेद __________ येथे स्पष्ट केले आहे.

(1) 14 (2) 12 (3) 13 (1) (4) 51 (क)

---

**75.** नादारी/कर्जबाजारीपणा, अपेक्षित नसेल किंवा ज्यावर नियंत्रण नसेल अशा परिस्थितीत झालेला असल्याची बाब सिद्ध करण्याची जबाबदारी कोणावर असते?

(1) नादार व्यक्ती फक्त शिक्षेस पात्रच आहे, त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(2) सदरची जबाबदारी शासनाची असते.

(3) सदरची जबाबदारी बँकेची असते.

(4) सदरची जबाबदारी शासकीय कर्मचाऱ्याची असते.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

## विभाग - ब

76. शाखेतील थकित कामांची स्थिती दर्शविणारी 'साप्ताहिक थकित कामांची यादी' नियमित ठेवण्याची जबाबदारी कोणावर आहे ?

(1) सहाय्यक (2) सर्वसाधारण लिपिक (3) अवर सचिव (4) कार्यासन अधिकारी

---

77. महाराष्ट्र शासन सेवेमध्ये सरळसेवा प्रवेशासाठी __________ टक्के मागासवर्गीयांसाठी आरक्षण आहे.

(1) 19% (2) 13% (3) 30% (4) 52%

---

78. अध्यादेश प्रस्थापित करण्याचे अधिकार राज्यपालास कोणत्या अनुच्छेदानुसार देण्यात आले आहेत ?

(1) 213 (2) 293 (3) 333 (4) 121

---

79. प्रत्येक वर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानाचा '**कालावधी**' कोणता आहे ?

(1) 1 मार्च ते 31 मार्च
(2) 1 एप्रिल ते 31 मे
(3) 31 ऑक्टोबर ते 14 नोंव्हेबर
(4) 20 ऑगस्ट ते 2 ऑक्टोबर

---

80. ''सर्वसाधारण प्रकरणे'' किती कालावधीच्या आत प्रस्तुत करण्यात यावीत ?

(1) चार दिवस (2) पंधरा दिवस (3) दहा दिवस (4) सात दिवस

---

81. 'अध्यादेश' प्रस्थापित करणे आणि तो काढून घेणे यासंबंधातील प्रकरणे अंतिम मान्यतेसाठी कोणास सादर करणे आवश्यक आहे ?

(1) मुख्यमंत्री
(2) उपमुख्यमंत्री
(3) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती
(4) राज्यपाल

---

82. एखाद्या प्रश्नाचे उत्तर विधानसभेत देण्यापूर्वी ते कोठे प्रसिद्ध करण्यात येते ?

(1) शासकीय राज पत्रात
(2) वृतपत्रामध्ये
(3) प्रसार माध्यम
(4) यापैकी कोठेही नाही

---

83. विधानसभेच्या प्रस्तुत दिवसाच्या कामकाजाच्या क्रमामध्ये कोणत्याही एका सदस्याच्या नावावरील ठरावापैकी जास्तीत जास्त किती अशासकीय ठरावांचा समावेश केला जाऊ शकतो ?

(1) पाच (2) एक (3) कितीही (4) दोन

---

84. आवकपत्रांच्या कार्यवाहीचा प्राथम्यक्रम कोण ठरवितो ?

(1) दैनंदिनी लिपिक
(2) कार्यासन अधिकारी
(3) सहाय्यक
(4) सर्वसाधारण लिपिक

---

**कच्च्या कामासाठी जागा**

85. दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाचे 'अध्यक्ष' कोण आहेत ?
(1) श्री. पृथ्वीराज चव्हाण (2) श्री. व्ही मोइली
(3) श्री. शरद पवार (4) श्रीमती सोनिया गांधी

86. कार्यालयाच्या अंतर्गत कामकाजाविषयी उदा-नेमणूक, ज्येष्ठतासूची इ. बाबीतील सूचना किंवा निर्णय कर्मचारीवर्गास कळविण्यासाठी ____________ या नमुन्याचा वापर करतात.
(1) ज्ञापन (2) परिपत्रक (3) अधिसूचना (4) कार्यालयीन आदेश

87. दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीवर नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विधानसभेच्या सदस्यांच्या संख्येबाबत खालील पैकी कोणते विधान अचूक आहे ?
(1) विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या दोन-तृतीयांश पेक्षा कमी
(2) विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या किमान एक-तृतीयांश
(3) समितीच्या एकूण सदस्यसंख्येच्या दोन-तृतीयांश पेक्षा कमी नाही एवढी
(4) समितीच्या एकूण सदस्यसंख्येच्या कमाल एक-तृतीयांश

88. भारत सरकारकडे किंवा इतर राज्यशासनाकडे पाठवावयाची पत्रे कोणत्या अधिकाऱ्याने स्वाक्षरीत करायची असतात ?
(1) कार्यासन अधिकारी दर्जाच्या (2) अवरसचिव दर्जाच्या
(3) उपसचिव किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाच्या (4) वरील सर्व

89. राज्याचे प्रथम 'मुख्य माहिती आयुक्त' कोण होते ?
(1) श्री. रामानंद तिवारी (2) श्री. विजय कुवळेकर
(3) श्री. एस.व्ही. जोशी (4) श्री. रत्नाकर गायकवाड

90. 'अ' आणि 'ब' वर्गामध्ये वर्गीकरण केलेल्या फाईलींचे किती वर्षांनी पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे ?
(1) दर दहा वर्षांनी (2) दर पाच वर्षांनी
(3) दर तीन वर्षांनी (4) पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता नाही

91. महाराष्ट्र शासकीय कर्मचारी बदल्यांचे विनियमन अनुसार गट 'क' मधील कर्मचाऱ्यांची बदली करण्यास सक्षम प्राधिकारी कोण आहे ?
(1) विभाग प्रमुख (2) प्रादेशिक विभागप्रमुख
(3) कार्यालय प्रमुख (4) यापैकी कोणी नाही

92. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय/निमशासकीय व इतर क्षेत्रात सरळ सेवा भरतीमध्ये किती टक्के (%) समांतर आरक्षण ठेवण्याबाबत तरतूद आहे ?
(1) 3% (2) 7% (3) 5% (4) 15%

**कच्च्या कामासाठी जागा**

**93.** महाराष्ट्र राज्य वीज नियमन आयोग कोणत्या प्रकारात मोडतो ?

(1) शासनाचा विभाग (2) स्थानिक स्वराज्य संस्था

(3) शासनाचे महामंडळ (4) नियामक मंडळ

---

**94.** बिनसरकारी व्यक्तीला किंवा संस्थेला उद्देशून लिहीलेल्या पत्रामध्ये अधिकाऱ्याचा कोणता तपशील असावा ?

(1) अधिकाऱ्याचे फक्त पदनाम (2) अधिकाऱ्याचे नाव व पदनाम

(3) अधिकाऱ्याचे फक्त नाव (4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

**95.** मंत्र्यानी राज्यपालास काही सल्ला दिला होता काय आणि असल्यास कोणता, या बाबत कोणत्याही न्यायालयात चौकशी करता येणार नाही असे कोणत्या अनुच्छेदात अंतर्भूत करण्यात आले आहे ?

(1) 113 (2) 201 (3) 155 (4) 163

---

**96.** 'नागरिकांची सनद' (Citizen charter) प्रत्येक कार्यालय/विभागाने तयार करण्याचे बंधन कोणत्या कायद्यान्वये केले आहे ?

(1) महाराष्ट्र बदल्यांचे विनियमन आणि विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005

(2) माहितीचा अधिकार अधिनियम, 2005

(3) सार्वजनिक अभिलेख अधिनियम

(4) यापैकी कोणतेही नाही

---

**97.** मुद्रितावरच्या सर्व दुरुस्त्यांकरता कोणती शाई वापरावी ?

(1) हिरवी (2) लाल (3) काळी (4) निळी

---

**98.** विधानसभेत विचारण्यात आलेला प्रश्न विधानसभेच्या वेळेचा अपव्यय करणारा असून अधिकाराचा दुरुपयोग करून विचारला जात आहे असे ___________ यांचे मत असेल तर असा कोणताही प्रश्न ते स्विकृत करणार नाहीत.

(1) विरोधी पक्षनेते (2) विभागाचे प्रभारी मंत्री

(3) वरील दोघेही (4) वरील एकही नाही

---

**99.** महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख नियम 2007 अन्वये 'वर्गीकृत अभिलेख' याचा अर्थ शासनाच्या कोणत्या विभागाने वेळोवेळी प्रसूत केलेल्या विभागीय सुरक्षाविषयक अनुदेश नियमपुस्तिकेत निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीनुसार अतिगुप्त, गुप्त, गोपनीय आणि निर्बंधित म्हणून वर्गीकरण केलेल्या सार्वजनिक लेखाशी संबंधित असलेल्या 'फाईली' असा आहे ?

(1) सामान्य प्रशासन विभाग (2) विधी व न्याय विभाग

(3) गृह विभाग (4) महसूल विभाग

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**100.** आणीबाणीची उद्घोषणा जारी असताना संसदेला कायद्याद्वारे एकावेळी __________ वर्षापर्यंत विधानसभेचा कालावधी वाढविता येतो.

(1) 2 (2) 3 (3) 1 (4) 5

---

**101.** विधानसभा अध्यक्ष लोकलेखा समितीवर विधानसभेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त __________ सदस्यांची, नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करतात.

(1) 25 (2) 5 (3) 20 (4) 23

---

**102.** मंत्रालय अभिलेख कार्यालयातून प्राप्त केलेली फाईल किती कालावधीपेक्षा अधिक काळ ठेवून घेऊ नये ?

(1) 30 दिवस (2) 60 दिवस (3) 75 दिवस (4) 90 दिवस

---

**103.** अर्धा तास चर्चेची सूचना देताना तीस किमान किती सदस्यांनी सह्या करून पाठींबा दिलेला असला पाहिजे ?

(1) सभागृहाच्या 2/3 सदस्यांनी (2) सभागृहाच्या 1/3 सदस्यांनी

(3) दोन (4) एकही नाही

---

**104.** राज्यपाल संसदेच्या दोहोंपैकी व कोणत्याही सभागृहाच्या किंवा __________ केलेल्या कोणत्याही राज्याच्या विधानमंडळाचा सदस्य असणार नाही.

(1) दुसऱ्या अनुसूचीत समाविष्ट (2) दुसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट

(3) पहिल्या अनुसूचीत समाविष्ट (4) पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट

---

**105.** महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम 2005 अन्वये अभिलेख पाहण्यासाठी पहिल्या तासानंतरच्या प्रत्येक पंधरा मिनिटाकरिता किती फी आकारण्याबाबत तरतूद आहे ?

(1) दहा रुपये (2) पाच रुपये (3) पंधरा रुपये (4) वीस रुपये

---

**106.** विधानमंडळ सदस्याने दाखल केलेला एखादा प्रश्न स्वीकारार्ह होण्यासाठी,

(a) प्रश्नातील विधानाच्या अचुकतेबद्दल विधानमंडळाचे सचिव जबाबदार असतील,

(b) त्यात सभागृहाने नेमलेल्या समितीच्या कामकाजाविषयीची माहिती विचारलेली असू नये,

(c) त्यात आधीच उत्तर दिलेल्या प्रश्नांच्या आशयाची पुनरावृत्ती असू नये,

(d) त्यात महाराष्ट्र शासनाला प्रामुख्याने जबाबदार असलेल्या संस्थांच्या किंवा व्यक्तींच्या नियंत्रणाखाली असलेल्या बाबीच उपस्थित करण्यात आलेल्या असाव्यात.

(1) सर्व पर्याय बरोबर आहेत (2) केवळ पर्याय (a) व (d) बरोबर आहेत.

(3) केवळ पर्याय (b), (c) व (d) बरोबर आहेत. (4) सर्व पर्याय चुकीचे आहेत.

---

कच्च्या कामासाठी जागा

107. दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समित्यांच्या संदर्भात कोणते विधान अचूक आहे ?

(a) संबंधित विभागाचा प्रभारी मंत्री प्रत्येक संयुक्त समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असेल.

(b) संयुक्त समितीवर नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विधानसभा सदस्यांची संख्या राज्यपाल ठरवितात.

(1) (a) व (b) दोन्ही बरोबर (2) (a) व (b) दोन्ही चूक

(3) (a) चूक व (b) बरोबर (4) (a) बरोबर व (b) चूक

---

108. ''सीईआर-1158 - ई'' या फाईल क्रमांकामध्ये 'ई' हे अक्षर काय दर्शविते ?

(1) फाईलीचे मुख्य शीर्ष (2) फाईल कोणत्या कार्यासनाची आहे

(3) फाईलीचे उपशीर्ष (4) फाईलीचे वर्ष

---

109. जेव्हा एखादा ठराव मांडण्यात येऊन त्यावर मतदान झाले असेल तेव्हा तशाच आशयाचा प्रश्न उपस्थित करणारा कोणताही ठराव अथवा सुधारणा आधीच्या ठरावावर मतदान झाल्याच्या दिनांकापासून किती कालावधीत मांडता येणार नाही ?

(1) त्याच अधिवेशनात (2) तीन महीने (3) सहा महिने (4) एक वर्षाच्या आत

---

110. ज्या प्रश्नांना कोणतीही तोंडी उत्तरे देण्यात येत नाहीत परंतु असे प्रश्न व त्यांची उत्तरे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतात अशा प्रश्नांना काय म्हणतात ?

(1) पुरवणी प्रश्न (2) अतारांकित प्रश्न (3) तारांकित प्रश्न (4) अधिसूचना प्रश्न

---

111. विधानपरिषदेचे सभापती आश्वासन समितीसाठी जास्तीत जास्त किती सदस्य नामनिर्देशित करतात ?

(1) 19 (2) 29 (3) 9 (4) 99

---

112. विचारलेल्या पुरवणी प्रश्नास नोटीसीशिवाय उत्तर देण्यास आपण असमर्थ आहोत असे संबंधित मंत्री म्हणाले तर,

(1) पिठासन अधिकारी तो प्रश्न नामंजूर करतील

(2) तो प्रश्न अतारांकित समजला जाईल

(3) संबंधित मंत्री त्या सदस्यास तसे लेखी कळवितील

(4) सभागृहाच्या त्यानंतरच्या बैठकीच्या वेळी फक्त नवीन स्वरूपातच तो प्रश्न विचारता येईल

---

113. राज्य शासनाच्या मालकीच्या त्यात निहीत असलेल्या किंवा त्याच्या व्यवस्थापनाखाली असलेल्या सर्व निधीची सुरक्षा आणि समुपयोजन यासाठी कोणता विभाग जबाबदार राहील ?

(1) नियोजन विभाग (2) विधी व न्याय विभाग

(3) संबंधित विभाग (4) वित्त विभाग

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**114.** एकाच सदस्याने ताराचिन्ह करून वेगळ्या दाखविलेल्या __________ प्रश्नाहून अधिक नसतील इतके प्रश्न एका दिवशी तोंडी उत्तरासाठी असलेल्या प्रश्नांच्या यादीत दाखल करता येतात.

(1) 1 (2) 3 (3) 5 (4) 7

---

**115.** एखादी महत्वाची बाब वा निर्णय अधिकाऱ्यांच्या व्यक्तिगत निदर्शनास आणून त्यांचे लक्ष वेधण्यासाठी __________ या पत्रव्यवहाराचा वापर करतात.

(1) साधे पत्र (2) पृष्ठांकन (3) स्मरणपत्र (4) वरील एकही नाही

---

**116.** महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 कोणास लागु आहे ?

(1) केंद्र शासनाचे कर्मचारी

(2) फक्त राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी

(3) अखिल भारतीय सेवेतील महाराष्ट्र संवर्गाच्या अधिकाऱ्यांसह राज्य सेवेतील सर्व शासकीय कर्मचारी

(4) विधीमंडळ कर्मचारी

---

**117.** एखाद्या राज्यामध्ये विधानपरिषद निर्माण करणे अथवा रद्द करणे यासाठी विधानसभेच्या किती सदस्यांची मान्यता आवश्यक आहे ?

(1) बहुमताने आणि उपस्थित व मतदान करणाऱ्या 1/3 सदस्य

(2) बहुमताने आणि उपस्थित व मतदान करणाऱ्या 1/2 सदस्य

(3) बहुमताने आणि उपस्थित व मतदान करणाऱ्या 2/3 सदस्य

(4) बहुमताने आणि उपस्थित व मतदान करणाऱ्या 1/4 सदस्य

---

**118.** स्थानिक स्वराज्य संस्थांमधील एकूण सदस्यसंख्येपैकी महिलांसाठी किती टक्के आरक्षण विहित केले आहे ?

(1) 33 (2) 40 (3) 50 (4) 66

---

**119.** कोणत्याही प्रकरणाशी संबंधित अभिलेख, पूर्वोदाहरणे, नियम, विनिमय, पुस्तके किंवा इतर संबंधित कागदपत्रे प्रस्तुत करण्याच्या व तसा निर्देश करण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात ?

(1) बंद (टँग) लावणे (2) संदर्भ देणे (3) कागदपत्र देणे (4) स्मरणपत्र देणे

---

**120.** केंव्हापासून मराठी ही महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली आहे ?

(1) 26 जानेवारी, 1960 (2) 26 जानेवारी, 1965

(3) 26 जानेवारी, 1975 (4) 26 मे, 1965

---

**121.** विभागीय व जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समिती अंतर्गत स्थापन केलेल्या दक्षता समितीचे अध्यक्ष कोण असतात ?

(1) अशासकीय व्यक्ती (2) पोलीस उपनिरीक्षक

(3) दुय्यम निरीक्षक (4) जिल्हयातील वरिष्ठतम अधिकारी

---

**कच्च्या कामासाठी जागा**

122. विधानसभा सदस्याने विचारलेला एखादा प्रश्न तारांकित किंवा अतारांकित समजण्यात यावा हे ठरविण्याचा अंतिम अधिकार कोणाला आहे ?
(1) प्रश्न विचारणारा सदस्य (2) कामकाज सल्लागार समिती
(3) विधानमंडळाचे सचिव (4) विधानसभेचे अध्यक्ष

123. कार्यासनात प्राप्त झालेल्या सर्व दैनंदिन टपालाचे अवलोकन केल्याचे निदर्शक म्हणून ________ प्रत्येक आवकपत्रावर स्वाक्षरी/आद्याक्षरी करील.
(1) लिपिक टंकलेखक (2) सहाय्यक (3) टंकलेखक (4) कार्यासन अधिकारी

124. माहितीचा अधिकार कायदा 2005 अन्वये जीवित व स्वातंत्र्याशी संबंधित माहिती किती कालावधीत पुरविणे आवश्यक आहे ?
(1) 72 तास (2) 48 तास (3) 60 तास (4) एक आठवडा

125. 'माहिती तंत्रज्ञान दिन' कोणत्या दिवशी साजरा करण्यात येतो ?
(1) 14 नोव्हेंबर (2) 2 ऑक्टोबर (3) 20 ऑगस्ट (4) 1 मे

126. ________ प्रलंबित असलेल्या विभागाच्या संदर्भांची एकत्रित सूची दर पंधरवाडयास वित्त विभागाकडे पाठविणे आवश्यक आहे.
(1) एक आठवडा (2) दोन आठवडे (3) तीन आठवडे (4) तीन महिने

127. RFD म्हणजे ________.
(1) Result - Framework Document (2) Revenue and Forest Department
(3) Result Form Design (4) Recognised Form Document

128. मंत्रीपरिषद ________ सामुदायिकपणे जबाबदार असते.
(1) राज्य विधानसभेस (2) राज्य विधानमंडळाला
(3) मंत्रीमंडळ निर्णयास (4) जनरोषास

129. आजारपणाच्या कारणास्तव किती दिवसापेक्षा अधिक कालावधीसाठीच्या अनुपस्थितीच्या बाबतीत कर्मचाऱ्याने त्याच्या पृष्ठयर्थ वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले पाहिजे ?
(1) तीन (2) दोन (3) एक (4) यापैकी नाही

130. राज्याच्या महा-अधिवक्तापदावर ________ व्यक्तीस ________ महाअधिवक्ता म्हणून नियुक्त करतात.
(1) उच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यास जी व्यक्ती अर्हता प्राप्त असेल अशा एखाद्या, राज्यपाल
(2) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशासाठी असणारी अर्हता प्राप्त, राष्ट्रपती
(3) जिल्हा न्यायाधिशासाठी पात्र असणाऱ्या, राज्याचे न्यायमंत्री
(4) यापैकी नाही

**कच्च्या कामासाठी जागा**

**131.** कोणत्याही बाबीबाबत एखादा विभाग आणि महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यामध्ये मतभेद उद्भवल्यास ती बाब कोणाच्या निदर्शनास आणण्यात यावी ?

(1) विभागाच्या सचिवामार्फत राज्यमंत्री (2) प्रभारी मंत्र्यामार्फत मुख्यमंत्री

(3) मुख्य सचिवामार्फत प्रभारी मंत्री (4) विभागाच्या मंत्र्यामार्फत उपमुख्यमंत्री

---

**132.** सर्वोच्च न्यायालयात अथवा उच्च न्यायालयात कोणत्याही न्यायाधिशाने आपले कर्तव्य पार पाडताना केलेल्या वर्तणूकीबाबत ____________ .

(1) संसदेत चर्चा करता येते

(2) संसदेत चर्चा करता येत नाही

(3) राज्याच्या विधानमंडळात कोणतीही चर्चा करता येत नाही

(4) यापैकी नाही

---

**133.** विधानसभा नियम 101 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेत,

(a) भाग घेण्याची प्रथम संधी चर्चेची पूर्वसूचना देणाऱ्या सदस्यास दिली जाते.

(b) नोटीस देणाऱ्या सदस्यास निवेदन करता येते.

(c) उपस्थित विषयावर मंत्री उत्तर देतात.

(d) उपस्थित मुद्यांवर मतभेद झाल्यास मतदान घेतले जाते.

(1) सर्व पर्याय बरोबर आहेत. (2) केवळ पर्याय (a), (b) व (c) बरोबर आहेत.

(3) केवळ पर्याय (b), (c) व (d) बरोबर आहेत. (4) केवळ पर्याय (c) व (d) बरोबर आहेत.

---

**134.** विधानसभेत विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर कोणी देणे अपेक्षित असते ?

(1) कक्ष अधिकाऱ्याने (2) विभागाच्या सहसचिवाने

(3) विभागाच्या सचिवाने (4) विभागाच्या मंत्र्याने

---

**135.** महाराष्ट्र विधानसभा नियम 228 अन्वये शासकीय आश्वासन समितीच्या संदर्भात संबंधित विभागाचा सचिव, समितीने त्यास सांगितले असेल तर समितीच्या चर्चेत तिला सहाय्य करण्यासाठी तिच्या बैठकींना हजर राहणार नाही व समितीस अपेक्षित माहिती पुरवणार नाही.

(1) वरील विधान बरोबर आहे (2) वरील विधान चूक आहे

(3) अंशत: बरोबर आहे (4) वरील तिन्ही पर्याय बरोबर आहेत

---

**136.** राज्य शासनाच्या ई धोरणांतर्गत कोणत्या बाबींचा समावेश आहे ?

(1) ऑनलाईन पोर्टल (2) युनिक आयडेंटिफिकेशन

(3) डॉक्यूमेंट मॅनेजमेंट सिस्टिम (4) वरील सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**137.** निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर अल्पवेळ चर्चा उपस्थित करण्याबाबत

(a) महाराष्ट्र विधानसभा नियम 101 अन्वये तरतूद आहे.

(b) महाराष्ट्र विधानपरिषद नियम 97 अन्वये तरतूद आहे.

(1) (a) व (b) दोन्ही बरोबर (2) (a) बरोबर

(3) (b) बरोबर (4) (a) व (b) दोन्ही चूक

---

**138.** विधानसभा आश्वासन समितीमध्ये जास्तीत जास्त किती सदस्यांचा समावेश असतो ?

(1) 19 (2) 29 (3) 39 (4) 49

---

**139.** विधानपरिषदेत अर्धा तास चर्चेकरिता मांडावयाची बाब ही पुरेशी सार्वजनिक महत्वाची आहे किंवा कसे हे ठरविण्याचे अधिकार कोणाला आहेत ?

(1) विरोधी पक्ष नेता (2) मुख्यमंत्री

(3) सभापती (4) यापैकी कोणी नाही

---

**140.** एखाद्या प्रश्नाचे उत्तर देण्यात आल्यावर कोणत्याही सदस्यास ज्या बाबीसंबंधी उत्तर देण्यात आले असेल अशी कोणतीही बाब आणखी स्पष्ट होण्यासाठी _________ विचारता येईल.

(1) पुरवणी प्रश्न (2) कपात सूचना (3) अल्प सूचना (4) अल्पावधी सूचना

---

**141.** 'राज्याच्या कारभाराच्या प्रशासनासंबंधी व विधीविधानाकरिता आलेल्या प्रस्तावासंबंधी राज्यपाल मागतील ती माहिती पुरविणे हे प्रत्येक राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे कर्तव्य असते' हे कोणत्या अनुच्छेदामध्ये स्पष्ट केले आहे ?

(1) 167 (2) 175 (3) 199 (4) 201

---

**142.** राज्याचे विनियोजन लेखे व नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा त्यावरील अहवाल यांचे परीनिरीक्षण करण्याचे काम कोणाद्वारे केले जाते ?

(1) अंदाज समिती (2) उपविधान समिती (3) आश्वासन समिती (4) लोकलेखा समिती

---

**143.** एखादया विशिष्ट प्रकरणातील शासनाचा निर्णय हा भारतीय संघराज्याच्या एखादया विधीविषयक विशिष्ट प्रश्नावरील निर्धारणावर अवलंबुन असला पाहिजे हे स्पष्ट असेल अशावेळी प्रकरण शासनास सादर करण्यापूर्वी अभिप्रायासाठी कोणाकडे संदर्भित करण्यात यावे ?

(1) सामान्य प्रशासन विभाग (2) वित्त विभाग

(3) शासनाचे विधी सल्लागार (4) उच्च न्यायालय

---

**144.** विधानसभेतील ज्या शासकीय ठरावांची नोटीस मंत्री किंवा महाअधिवक्ता यांनी दिलेली असेल, त्या ठरावांना पुढील विधानसभा नियमांच्या तरतूदी लागु असणार नाहीत.

(1) नियम 106 (2) नियम 107 (3) नियम 108 (4) नियम 109

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**145.** अर्धा तास चर्चेसाठी नोटीस देणारा सदस्य अनुपस्थित असल्यास सदर अर्धा तास नोटीसवर चर्चा

(1) होत नाही.
(2) राखून ठेवता येते.
(3) त्या नोटीशीस पाठींबा देणाऱ्या कोणत्याही सदस्यास अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेस सुरूवात करता येते.
(4) नोटीस रद्द होते.

---

**146.** कार्यासनातील सर्व कर्मचाऱ्यांच्या संदर्भासाठी आवश्यक असणारी 'निवड फाईल' कोणाच्या ताब्यात असते ?

(1) टिप्पणी सहायक (2) कक्ष अधिकारी
(3) गोपनीय लिपिक (4) सर्वसाधारण लिपिक

---

**147.** PMES म्हणजे __________.

(1) Prime Minister's Employment Scheme
(2) Performance Monitoring and Evaluation System
(3) Prime Management and Energy Study
(4) Performance Methodology and Environment Study

---

**148.** विधान परिषदेत एखाद्या प्रश्नाचे उत्तर देण्यात आल्यावर कोणत्याही सदस्यास ज्या बाबी संबंधी उत्तर देण्यात आले असेल अशी कोणतीही बाब स्पष्ट करण्यांच्या कारणासाठी पुरवणी प्रश्न

(1) विचारता येणार नाही (2) विचारता येईल
(3) लेखी उत्तर मागविता येईल (4) यापैकी काही नाही

---

**149.** महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम कोणत्या वर्षापासून अंमलात आलेला आहे ?

(1) सन 2006 (2) सन 2007 (3) सन 2005 (4) सन 2008

---

**150.** राज्यपालास सहाय्य करण्याकरिता व सल्ला देण्याकरिता मंत्रिपरिषदेची तरतूद अनुच्छेद __________ अन्वये करण्यात आली आहे.

(1) 161 (2) 162 (3) 163 (4) 164

---

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा**

## सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलतः प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा**

SEAL